**ठळक बातम्या**

- समुद्रापासून आकाशापर्यंत देश अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन/ गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीच्या स्थानिक मूर्ती खरेदी करण्याचं केलं आवाहन

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांचं प्रतिपादन

- देशव्यापी पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत राज्याचा सहभाग

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सेशेल्सचा गार्डियन ऑफ द ब्ल्यू होरायझन सन्मान प्रदान

**<><><><><>**

भारत आज समुद्रापासून आकाशापर्यंत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे पस्तीसाव्या भागातून ते देशोदेशीच्या श्रोत्यांशी बोलत होते. जून महिन्यात विविध क्षेत्रात देशानं साध्य केलेल्या ऐतिहासिक यशाचा त्यांनीआढावा घेतला.

कोलकात्यात झालेल्या कार्यक्रमात आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय ही अद्ययावत जहाजं भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्याचं त्यांनी सांगितलं. या जहाजांच्या आरेखनापासून ते निर्मितीपर्यंत सर्व काही स्वदेशी असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. सी-295 या स्वदेशनिर्मित विमानानं पहिलं उड्डाण केल्याचं सांगून ते म्हणाले, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र तसंच हवाई अंतराळ क्षेत्राला नवं बळ मिळू लागलं आहे, रोजगाराच्या संधी वाढत आहेत आणि आत्मनिर्भर भारताचा संकल्प अधिक दृढ होत आहे. स्वदेशनिर्मित लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी डीआरडीओनं केल्याची माहिती त्यांनी दिली.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचं यशस्वी आयोजन झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सांगितलं, परदेशात अडीच हजारापेक्षा जास्त ठिकाणी योगाभ्यास करण्यात

आला. देशातही योग विषयक कार्यक्रमांमध्ये कोट्यवधींनी सहभाग घेतल्याचं त्यांनी सांगितलं. अहमदाबाद इथं झालेल्या जागतिक योगासन स्पर्धेत भारतानं १०२ सुवर्णपदकांसह एकूण ११४ पदकं जिंकल्याबद्दल त्यांनी विजयी खेळाडूंचं अभिनंदनही केलं.

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आपण देशवासियांना केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. त्याबद्दल नागरिकांचे आभार मानून, लोकसहभागाची हीच ताकद आपल्याला यशस्वी करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपल्या कुटुंबातल्या लग्नसोहळ्याचा आनंद समाजाबरोबर वाटून घेण्याचा प्रयत्न म्हणून नांदेडच्या बहादूरपुरा गावातल्या पेटकर कुटुंबानं गावातल्या सुमारे साडेतीन हजार लोकांच्या प्रत्येकी एक लाख रुपयांच्या अपघात विम्याची व्यवस्था केल्याचं उदाहरण त्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

**- - - - होल्ड - बाईट MKB PETHKAR - - - -**

यानिमित्तानं केंद्र सरकारच्या वतीनं प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत दिलं जाणारं अपघाती विमा सुरक्षा कवच, आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना याविषयी प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. श्रोत्यांनी आपल्या कुटुंबांपर्यंत या योजनांची माहिती पोहचवावी असं आवाहनही त्यांनी केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या या उपक्रमाची मन की बात मध्ये दखल घेतल्याबद्दल अनुप पेटकर यांनी आनंद झाल्याची भावना आकाशवाणीकडे व्यक्त केली आहे..

**- - - - होल्ड - बाईट पेटकर - - - -**

समाजातल्या अंधश्रद्धेच्या धोक्यांचा उल्लेखही प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला. अंधश्रद्धेमुळं भीती निर्माण होते, माणूस सत्य पाहणं थांबवतो, याची जाणीव त्यांनी करून दिली. आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनलेल्या मूर्ती खरेदी करू नयेत असं आवाहन त्यांनी केलं.

मातीच्या मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळत असल्यानं आपले जलस्त्रोत आणि पर्यावरणाचं रक्षण होतं, आणि त्यासोबतच आपली श्रद्धाही टिकून राहते असं ते म्हणाले.

गणपतीची मूर्ती खरेदी करताना स्थानिक मूर्तिकारांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करून व्होकल फॉर लोकलचा संकल्प अधिक दृढ करावा असं आवाहनही त्यांनी या निमित्तानं केलं.

सध्या सुरु असलेल्या पावसाच्या हंगामात कॅच द रेन या अभियानाअंतर्गत पावसाचा प्रत्येक थेंब वाचवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

'विकसित भारत २०४७' हे स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. विकसित भारत ग्रामीण योजनेसाठी ग्रामविकास मंत्रालयानं राज्यसरकारांच्या सहभागानं एक लाख ५१ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद केल्याची माहिती राष्ट्रीय ग्रामीण विकास संमेलनात बोलताना त्यांनी दिली.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर निर्मितीसाठीच्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्या असून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. वाढवण बंदराच्या कामाची पाहणी केल्यानंतर ते आज बातमीदारांशी बोलत होते. जमीन संपादनाची काही कामं राहिली आहेत, स्थानिकांना विश्वासात घेऊन ती कामं पूर्ण केली जातील, असं मुख्यमंत्री म्हणाले. या प्रकल्पातून दहा लाख रोजगार निर्मिती होणार आहे, त्यात पालघर जिल्ह्यातल्या रहिवाशांना सामावून घेतलं जाईल, मच्छिमारांसाठी मासेमारी करण्यासाठीही एक बंदर तयार केलं जाईल, यासोबतच विरारजवळ एक नवा विमानतळही उभा केला जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आज देशभरात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत राज्यात सर्वत्र पाच वर्षांपर्यंतच्या बालकांचं लसीकरण केलं जात आहे. एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हास्तरावर प्रशासनानं व्यापक नियोजन केलं आहे. पोलिओ लस देण्याकरिता ठिकठिकाणी बूथ उभारले असून ट्रांझिट बूथ, फिरती पथकंही कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसंच संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी विविध पातळ्यांवर पर्यवेक्षकांच्याही नेमणूका करण्यात आल्या आहेत.

**यवतमाळ** जिल्ह्यात आज जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी या मोहिमेचे उद्घाटन केलं जिल्ह्यात दोन लाख पाच हजार एकशे सत्तावीस बालकांना पोलिओ लस देण्या साठी व्यापक नियोजन करण्यात आलं आहे. दुर्गम आणि तात्पुरत्या वस्त्यांसाठी दीडशे मोबाइल टीम्स कार्यरत असून, प्रवासात असलेली मुलंही लसीकरणापासून वंचित राहू नयेत म्हणून ३४ फिरती पथकंही सज्ज आहेत

**रत्नागिरीत** पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा प्रारंभ झाला असून ५८ हजार ८१५ बालकांच्या लसीकरणाचं उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवलं आहे.

**नांदेड** जिल्ह्यातल्या ३ लाख ८८ हजार बालकांना पोलिओचा डोस देण्याचं उद्दिष्ट असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली.

**बीड** जिल्ह्यात भाजप आमदार नमिता मुंदडा आज राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ निमित्त नागरी रुग्णालय, अंबाजोगाई इथं आयोजित पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी झाल्या.

**गडचिरोली इथं** आमदार डॉ. मिलिंद नरोटे आणि नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर यांच्या हस्ते मोहिमेचं उद्घाटन झालं.

**सोलापूर** इथंही उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांच्या उपस्थितीत मोहीमेचं उद्घाटन झालं.

**नाशिक** महानगरपालिका क्षेत्रात दोन लाख मुलांच्या लसीकरणाचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना गार्डियन ऑफ द ब्ल्यू होरायझन हा सेशेल्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना इतर देशाकडून मिळालेला हा ३४ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. प्रधानमंत्र्यांनी हा पुरस्कार हवामान बदलाच्या आव्हानांविरोधात लढणाऱ्यांना समर्पित केला.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियातली सुरक्षा स्थिती पुन्हा एकदा बिकट झाली आहे. गेल्या काही तासांमध्ये दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हल्ले

केले. युध्दविरामाचं आणखी उल्लंघन केलं तर अमेरिका मोठं लष्करी प्रत्त्युत्तर देईल, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिला आहे.

**<><><><><>**

व्हेनेझुएलामधे झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर अमिस्ताद मोहिमे अंतर्गत भारताने पाठवलेली मदत व्हेनेझुएला इथं पोहचली. भारताने हवाई दलाची दोन विमानं मदतसामुग्री घेऊन शुक्रवारी पाठवली असून बचावकार्याला मदत करण्यासाठी ४१ सदस्यांचं पथकही पाठवलं आहे.

वेनेझुएलामधे आजही सकाळी अराग्वा किनाऱ्याजवळ भूकंपाचा धक्का जाणवला त्याची तीव्रता ५ पूर्णांक ६ दशांश रिक्टर नोंदली गेली. जपानमध्येही आज सकाळी पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का जाणवला. त्याची तीव्रता ६पूर्णांक १ दशांश रिक्टर इतकी होती.

**//<><><><><>//**